# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - सूर श्रावण
- कवी / कवयित्रीचे नाव :- डॉ.सौ.नयना विवेक काळे

नको अमावस्या आता
पौर्णिमा ही, नको मला
मिळो चांदण्या सोबती
कोर अखंडित मला
नको वैशाख वणवा
नको मेघांचा वर्षाव
मात्र अखंडित नांदो
घमघमता हा श्रावण
तार सप्तक नको ते
कुजबुज ही खर्जात
माझ्या आपल्या पट्टीचा
मिळो कोमल निषाद
नको रागांच्या बंदिशी
तानाआलापिंचे खेळ
मिळो फक्त आता मला
स्वच्छ सूर तो निर्मळ
श्रुती श्रुतींचा तो मेळ
नको मुळीच ही मला
माझ्या पट्टीच्या सुरांचा
मिळो नितळ गारवा
मनाचा तो तानपुरा
सच्या सुरात लागू दे
शुध्द सुरांचा पाऊस
अंगा अंगात भिनु दे
अन् झिम्माड पाऊस
मन पुरे शांतवू दे

Arghat Music Therapy

साधना........

बरेच शिकून शिकून सुध्धा,
तीन सप्तक कळत नव्हती.
स्वतःमेल्या शिवाय स्वर्ग सुध्धा,
मिळत नाही सांगत होती.
आकार उकार ओकरातील,
"साधना" मुळीच कळली नव्हती.
सात बारा समेच्या खुणेतील,
उचल मनात रुजत नव्हती.
लोकसंगीताचे सामाजिक महत्व
तुम्हीच आम्हाला शिकवले होते
फू बाई फूगडी, माझ्या खुणांतून
स्वरलीपिकारांचे महत्व सांगितले होते
खूप हुतूतू खेळून, खेळूनअखेर,
आज माझी पट्टी समजली.
हार्मोनियम चे काळ्या पांढऱ्यावर,
ती मन भरून वाजवली.
तानपुराचे दुप्पट तबला,
व्हॉल्यूम बराच वाढवला.
टेम्पोच्या बेरीज वाजाबकित,
माझाही वेग मला सापडला.
विविध वाद्यांची ओळख देत
तालाचे महत्व पटवले होत
सुर घसरतोय, ताल चुकतोय
वेळोवेळी उत्तराने दटावले होत
त्याचवेळी कुंभरासारखे मनापासून
साऱ्यांना कष्टाने घडवले होते
निदान भैरवी आधी तरी
आज खर खुरे जाणवते आहे
संगीत उपाचारतील.महत्व
मनास पूर्ण लोभवते आहे
पूर्ण रिकाम असण्या पेक्षा,

आज थोड ही असणं छानच आहे.
आर्ध्या पेल्यातील पोकळी पेक्षा,

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

आर्ध्या पेल्यात जीवन तर आहे
जीवनाची रेस जिंकलीच आहे
आपल्या ठिकाणी उन्नत आहे
आता तरी स्वतःच साठी जगायचे आहे
निर्भेळ आनंद शोधायचा आहे

Anahat Music Therapy